**<u>ठळक बातम्या</u>**

- ९० टक्के करदात्यांना ३ कार्यालयीन दिवसात परतावा देण्याचा जीएसटी परिषदेचा निर्णय

- सायबर फसवणूक, डीपफेक विरोधात जागतिक पातळीवर यंत्रणा उभारण्याची गरज प्रधानमंत्र्यांकडून व्यक्त

- येत्या ३ महिन्यात ठेवींवरचे व्याजदर वाढण्याची शक्यता नसल्याचं स्टेट बँकेच्या अध्यक्षांचं मत

- ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्या निधनाबद्दल देशभरातून शोक व्यक्त

आणि

- यंदाचा साहित्याचा नोबेल पुरस्कार कॅनडातल्या साहित्यिक ॲनी कार्सन यांना जाहीर

**<><><><><>**

जीएसटीच्या अंतर्गत पात्र असलेल्या ९० टक्के करदात्यांना ३ कार्यालयीन दिवसात परतावा मिळेल अशी घोषणा केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज केली. जीएसटी परिषदेच्या बैठकीत झालेल्या निर्णयांविषयी माहिती देताना त्या नवी दिल्लीत बोलत होत्या. विविध कारणांसाठी होणाऱ्या दंडाची रक्कम २५ हजार रुपयांवरुन कमी करुन १० हजार रुपये करायला परिषदेनं मान्यता दिली. १० हजार रुपयांपेक्षा कमी कर थकीत असेल तर त्या करदात्याला नोटीस पाठवली जाणार नाही.

जीएसटीच्या अंतर्गत अधिकाऱ्यांना असलेले अटकेचे अधिकार परिषदेनं काढून घेतले. कुणाला अटक करायची की दंड ठोठावायचा याचा निर्णय न्यायालय घेईल. उशिरा कर विवरणपत्र दाखल करणं किंवा चुकीचं दाखल करणं किंवा उशिरा कर भरणाऱ्यांकडून केवळ वसुली केली जाईल, त्यांच्याकडून व्याज आकारलं जाईल, दंड होईल, याशिवाय इतर काहीही कारवाई होणार नाही, असं सीतारामन यांनी स्पष्ट केलं. तसंच यापूर्वीच्या १ कोटीच्या मर्यादेऐवजी आता ५ कोटी रुपयांची कर चोरी झाल्याचं निदर्शनाला आलं तर खटला चालवला जाईल, असंही त्या म्हणाल्या. जीएसटीच्या नोंदणीतले नेहमीचे बदल आपोआप मंजूर करण्याच्या प्रणालीला परिषदेनं मंजुरी दिली. याशिवाय आणखी काही सेवांवर Input

Tax Credit मिळणार आहे. तसंच यापूर्वीच्या नोटिसा मागे घेतल्या जातील. आयकराप्रमाणे जीएसटीमध्येही करदात्यांच्या तक्रारी शंकांचं ऑनलाइन निवारण केलं जाईल, कुणालाही भेटण्याची गरज पडणार नाही अशी प्रणाली सरकार आणणार आहे. सध्या विविध राज्यांमध्ये व्यवसाय असणाऱ्या २ लाखांपेक्षा अधिक करदात्यांसाठी ही प्रणाली १ एप्रिल पासून सुरू करण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. आजच्या बैठकीत झालेल्या सर्व निर्णयांची अंमलबजावणी नव्या आर्थिक वर्षात होणार आहे. या सर्व निर्णयांमुळं व्यवसाय सुलभतेच्या मार्गातले ९९ टक्के अडथळे दूर झाले आहेत. हीच नव्या जीएसटी प्रणालीची सुरुवात असल्याचं अर्थमंत्र्यांनी सांगितलं.

महाराष्ट्रासह हरियाणा, कर्नाटक, केरळ, जम्मू-काश्मिर, दिल्ली आणि मेघालयचे मुख्यमंत्री, इतर राज्यांचे उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री या बैठकीला उपस्थित होते.

**<><><><><>**

परकीय भूमीतून होणारी सायबर फसवणूक, तसंच डीपफेकच्या वाढत्या धोक्याचा सामना करण्यासाठी जागतिक यंत्रणा उभारण्याची गरज आहे. त्यासाठी सरकारं, तंत्रज्ञान क्षेत्रातल्या कंपन्या, टेलिकॉम कंपन्या आणि वित्तीय संस्थांनी एकत्रितपणे काम करावं, असं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. नवी दिल्लीत इंडिया मोबाइल काँग्रेसला ते संबोधित करत होते. सायबर फसवणूक आणि सायबर गुन्हेगारीला कोणत्याही सीमा कळत नाहीत. फोन आणि नेटवर्कची सुरक्षितता हे आपलं पहिलं प्राधान्य असल्याचं मोदी यांनी सांगितलं.

***होल्ड... बाईट- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी***

आजच्या युगात मोबाइल हे फक्त संपर्काचं साधन राहिलं नसून शासन आणि सार्वजनिक सेवांच्या वितरणाचा महत्त्वाचा मार्ग झाला आहे, आणि त्यामुळे सायबर धोक्यांविरोधातले उपाय बळकट करणं आणखी आवश्यक झालं आहे, याकडे त्यांनी लक्ष वेधलं.

**<><><><><>**

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या नियमनासंदर्भातला मसुदा एका महिन्यात प्रसिद्ध केला जाईल, अशी माहिती, इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज दिली. या क्षेत्रातली सुरक्षा, डीपफेक, कौशल्यविकास आणि मानव प्रथम या मुद्द्यांवर या मसुद्यात भर

असेल, असंही त्यांनी सांगितलं. डीपफेक ही आजच्या समाजातली एक मोठी समस्या असून त्यांचा दर्जा दिवसेंदिवस आणखी उत्तम होत आहे, लोक त्यांच्यावर विश्वास ठेवतात, यामुळे त्यांची दिशाभूल होते, हा धोका त्यांनी अधोरेखित केला.

<><><><>

कर्करोगावरच्या, अनुसूचित यादीत नसलेल्या सर्व औषधांवरच्या नफ्याची कमाल मर्यादा, किरकोळ विक्री मूल्याच्या ३० टक्के इतकी निश्चित करायचा निर्णय केंद्र सरकारनं घेतला आहे. सर्व प्रकारच्या औषधांचा यात समावेश आहे. पुढच्या महिन्यापासून लागू होण्याची शक्यता असलेल्या या निर्णयामुळे कर्करोगावरच्या एकंदर ११० औषधांच्या किंमती कमी होण्याची शक्यता आहे.

<><><><>

बँक भरतीसाठीच्या विविध परीक्षांमध्ये डमी उमेदवार देणारी टोळी सीबीआयनं उघड केली आहे. या टोळीचा सदस्य असलेल्या जीएसटी निरीक्षकासह चार मुख्य सूत्रधारांना अटक केली आली आहे. सार्वजनिक परीक्षांच्या प्रक्रियेत हे आरोपी प्रत्यक्ष परीक्षार्थी म्हणून उपस्थित राहून लेखी परीक्षा तसंच मुलाखतीसह निवड प्रक्रियेच्या विविध टप्प्यांवर सहभागी होत होते. या प्रकरणी IBPS अर्थात इन्स्टिट्यूट ऑफ बँकिंग पर्सनल सिलेक्शननं तक्रार दाखल केली होती. त्यावरुन दिल्ली, बिहार, हरियाणा आणि पश्चिम बंगालमध्ये ही कारवाई झाली.

<><><><>

येत्या ३ महिन्यात ठेवींवरचे व्याजदर वाढवण्याची शक्यता स्टेट बँकेचे अध्यक्ष सी. एस. शेट्टी यांनी फेटाळून लावली आहे. रिझर्व्ह बँकेनं काल व्याजदरात पाव टक्के वाढ केल्याच्या पार्श्वभूमीवर ते बोलत होते. सध्या बाजारपेठेत पुरेशी तरलता उपलब्ध असल्यानं व्याजदर वाढणार नसल्याचं ते म्हणाले. पण कर्जाची मागणी वाढत राहिली तर काही बँकांना व्याजदर वाढवावे लागतील, अशी शक्यता त्यांनी वर्तवली.

<><><><>

रिझर्व्ह बँकेनं केलेली दरवाढ, कच्च्या तेलाचे वाढलेले दर यासारख्या कारणांमुळं आज देशातल्या शेअर बाजारात मोठी घसरण झाली. सेन्सेक्स आज १ हजार ४५ अंकांनी घसरुन ७१ हजार ५९३ अंकांवर बंद झाला. निफ्टी ३७१ अंकांची घट नोंदवून २२ हजार २३२ अंकांवर स्थिरावला.

आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत कच्च्या तेलाचे दर आज सव्वा ४ टक्क्यांनी वधारुन १०४ डॉलर प्रति बॅरेलच्या पलीकडे गेलं.

<><><><>

रेल्वे कर्मचाऱ्यांच्या बोनस संदर्भात समाजमाध्यमांवर व्हायरल झालेल्या बनावट पत्राची दखल घेतली जाऊ नये, असं रेल्वे बोर्डानं सगळ्या विभागांना कळवलं आहे. दुर्गापूजेच्या सणापूर्वी रेल्वे कर्मचाऱ्यांना दिल्या जाणाऱ्या बोनसबद्दल अद्याप अधिकृत पत्र जारी झालेलं नाही. व्हायरल पत्राच्या आधारावर कोणतीही रक्कम कर्मचाऱ्यांना देऊ नये, असं रेल्वे बोर्डानं स्पष्ट केलं आहे.

<><><><>

ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांचं आज पहाटे हृदयविकारानं निधन झालं. ते ७५ वर्षांचे होते. अंकुश, प्रतिघात, सलाम बॉम्बे, थोडा सा रूमानी हो जाए, राजू बन गया जेंटलमन, तिरंगा, क्रांतिवीर, यशवंत, अग्निसाक्षी, परिंदा, खामोशी, वेलकम, अब तक छप्पन अशा गाजलेल्या चित्रपटांमधून विविध रंगी भूमिका साकारत त्यांनी रसिकांच्या मनावर राज्य केलं. प्रहार या चित्रपटाचं दिग्दर्शनही नाना पाटेकर यांनी केलं होतं. सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेता, मुख्य अभिनेता असे विविध श्रेणीतले फिल्मफेअर पुरस्कार त्यांना मिळाले. केंद्र सरकारने त्यांना २०१३मध्ये पद्मश्री देऊन गौरवलं होतं. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी स्थापन झालेल्या नाम फाऊंडेशनचे ते संस्थापक सदस्य होते.

त्यांच्या निधनाबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, राज्यपाल जिष्णू देव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्यासह विविध क्षेत्रातल्या मान्यवरांनी दुःख व्यक्त केलं आहे. नाना पाटेकर यांच्या पार्थिवावर पुण्याजवळ डोणजे इथे शासकीय इतमामात अंत्यसंस्कार होणार आहेत.

<><><><>

यंदाचा साहित्याचा नोबेल पुरस्कार कॅनडाच्या साहित्यिक ॲनी कार्सन यांना जाहीर झाला आहे. ॲनी कार्सन या अभिजात ग्रीक साहित्याच्या अभ्यासक आणि अनुवादक आहेत. आधुनिक आणि साहित्याच्या पारंपरिक प्रकारांच्या सीमा ओलांडणाऱ्या लेखनशैलींशी ग्रीक पौराणिक कथांची सांगड घालण्याऱ्या साहित्यिक अशी त्यांची ओळख आहे. त्यादृष्टीनं त्यांची ऑटोग्राफी ऑफ रेड ही कथाकाव्य स्वरुपातली कादंबरी विशेष गाजली. इरॉस द बिटरस्वीट

हा प्रदीर्घ निबंध, ब्युटी ऑफ द हजबंड, नॉक्स, इफ नॉट विंटर या त्यांच्या साहित्यकृतीही प्रसिद्ध आहेत.

प्राचीन अभिजात साहित्य परंपरेशी संवाद साधत, समकालीन साहित्यात नवीन रूपं निर्माण करणाऱ्या त्यांच्या धाडसी आणि कल्पक साहित्यकृतींसाठी त्यांना या पुरस्काराच्या मानकरी म्हणून निवडलं असल्याचं हा पुरस्कार देणाऱ्या स्विडिश अकॅडमीनं म्हटलं आहे. १२ लाख अमेरिकी डॉलर्सचा हा पुरस्कार आहे.

<><><><><>

देशातल्या ग्रामीण भागातल्या क्रिकेटपटू आणि गायकांचा शोध घेणारी  किसान क्रिकेट लीग सुरू करण्याची घोषणा प्रसार भारती आणि इन-डॉट स्पोर्ट्स प्रायव्हेट लिमिटेड यांनी आज केली.

या लीगचं आयोजन पुढच्या वर्षी फेब्रुवारीमध्ये करण्यात येणार असून, सहभागासाठी नोंदणी पुढच्या दोन ते तीन आठवड्यांत सुरू होईल.

//<><><><><>//